# यशवंतराव चव्हाण कॉलेज
# इस्लामपूर जि.सांगली

## इतिहास विभाग

बी.ए.भाग.३ सत्र- ६ पे.नं. १६

## इतिहासाच्या पध्दती आणि उपयोजन

Methods & Applications of History

प्रा.डॉ.सौ.कल्पना राजीव मोहिते
प्रोफेसर इतिहास विभाग प्रमुख

# घटक-३ वस्तुसंग्रहालयशास्त्र - MUSEOLOGY

## क- वस्तुसंकलनाच्या पध्दती-
## वस्तुचे संवर्धन आणि जतन करण्याचे तंत्र

प्राचीन काळापासून आस्तित्वात असलेले,किल्ले,मंदिरे, राजवाडे व इतर वास्तूंचे आस्तित्व काही मानव निर्मित नैसर्गिक व घटकांमुळे धोक्यात येत असते त्यामुळे त्यांचे जतन व संवर्धन होणे अत्यंत्य आवश्यक आहे.

# अपकर्ष

## अपकर्ष म्हणजे ऱ्हास होय

संग्रहित वस्तू आणि त्या वस्तूचा नाश करणारे,हानी करणारे विविध घटक या दोहोंच्यामधील परस्पर प्रक्रियेमुळे वस्तूच्या मूळ स्वरुपात झालेला बदल म्हणजेच अपकर्ष होय.

# अपकर्ष -

•

वस्तूंच्या अपकर्षाची कारणे/ ऱ्हासाची कारणे

**मानव निर्मित कारणे-**

१- वस्तूंची अयोग्य हाताळणी
२- नागरी विकास
३- हादरे
४- आग

•

# वस्तूंच्या अपकर्षाची मानव निर्मित कारणे

- वस्तूंची अयोग्य हाताळणी-

  अयोग्य हाताळणीमुळे वस्तूंची हानी होते.
  वस्तू प्राप्त ठिकाणाहेन वाहून नेताना,
  प्रदर्शनासाठी मांडणी करत असताना,
  देखभाल व दुरुस्ती करत असताना,व्यवस्थित
  काळजी न घेतल्याने वस्तूस हानी पोहचते.
  काचेच्या वस्तू,नाजूक मूर्ती,मातीची भांडी
  इ.सारख्या वस्तूंची काळजीपूर्वक हाताळणी करावी.

# वस्तूंच्या अपकर्षाची मानव निर्मित कारणे -

नागरी विकास - वाढती लोकसंख्या,रोजगाराच्या संधीमुळे खेड्यांतून शहराकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर ,शहरातील वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न, दळणवळणासाठी रेल्वे व रस्तेमार्ग,विविध कार्यालये औद्योगीकरणामुळे जागेचा प्रश्न निर्माण झाल्यास ऐतिहासिक वास्तू कधीकधी नामशेष करण्यात येतात नागरी विकास हा देखील ऐतिहासिक वस्तूंच्या अपकर्षाचे कारण ठरु पाहत आहे.

## वस्तूंच्या अपकर्षाची मानव निर्मित कारणे -

- हादरे- वस्तूंचे स्थलांतर करताना प्रवासामध्ये हादरे बसून बाधा पोहचू शकते. इमारतींचा पाया, रस्त्यांचे बांधकाम, ब्लास्टींगमुळे, ऐतिहासिक वास्तूंना हादरे बसून तडे जाण्याची शक्यता असते. कर्णकर्कश आवाजामुळेही वस्तूंना हादरे बसून धोका निर्माण होऊ शकतो.

# वस्तूंच्या अपकर्षाची मानव निर्मित कारणे -

- आग –

ऐतिहासिक वास्तूंना विध्वंस करणारा घटक म्हणजे आग. आगीपासून संरक्षणाची योग्य ती खबरदारी न घेतल्यास अनेक कार्बनी वस्तू उदा.कागद,लाकडी वस्तू,चामडे इ.ग्रहणशील असल्याने आगीच्या संपर्कात आल्यास भक्ष्यस्थानी  पडू शकतात.त्यामुळे या वस्तूंचे आगी पासून रक्षण करण्याची योग्य ती खबरदारी घ्यावी लागते.